(५)

"महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन" या योजनेस मान्यता आणि त्याअंतर्गत देण्यात येणा-या अर्थसहाय्यास मान्यता देण्याबाबत

---

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र.पफपपस-1099/प्र.क्र.110/सां.का.1,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-400 032.

दिनांक : 29 मे 1999

**शासन निर्णय :-** शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र.डीटीडब्ल्यु-1265/पन, दि.11 ऑगस्ट 1965 अन्वये "महाराष्ट्र राज्यातील निर्धन लेखक आणि कलावंत यांना वित्तीय सहाय्य देण्याच्या योजनेत" शासनाने मंजूरी देऊन त्यानंतर या योजनेमध्ये वेळोवेळी बदल करण्यात आलेला होता. सदरहू योजनेतील नियमामध्ये सुसूत्रीकरण करण्याच्या दृष्टीने परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन शासन या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन या सुधारित योजनेस त्याचप्रमाणे परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या नियमासही मान्यता देत आहे.

2. महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन या सुधारित योजने-अंतर्गत खाली नमूद केल्याप्रमाणे अर्थसहाय्य देण्यास शासन मंजूरी देत आहे:-

| अ.क्र. | वर्ग | दि.2.6.1994 च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेले सुधारित दर (वार्षिक) |
|---|---|---|
| 1. | 2. | 3. |
| 1. | वर्ग-अ | रु.8,400/- |
| 2. | वर्ग-ब | रु.7,200/- |
| 3. | वर्ग-क | रु.6,000/- |

3. यासाठी होणारा खर्च "2205-कला व संस्कृति-800-इतर खर्च (एक) साहित्य, कला इत्यादि क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना वित्तीय सहाय्य (2205 085)-20 इतर खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो खर्च त्या त्या वर्षाअंतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात यावा.

4. "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन" या सुधारित योजनेंतर्गत मान्यवरांना अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी उच्चस्तरिय समितीची स्थापना खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यास शासन या शासन निर्णयान्वये मंजूरी देत आहे:-

| | |
|---|---|
| 1) मंत्री, सांस्कृतिक कार्य | - अध्यक्ष |
| 2) राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य | - उपाध्यक्ष |
| 3) सचिव, सांस्कृतिक कार्य | - शासकीय सदस्य |
| 4) अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाटय परिषद | - अशासकीय सदस्य |
| 5) अध्यक्ष, महाराष्ट्र शाहिरी परिषद, पुणे | - अशासकीय सदस्य |

27 AUG 1999

(१६५)



Scanned with CamScanner

6) अध्यक्ष, महाराष्ट्र तमाशा परिषद, पुणे - अशासकीय सदस्य
7) अध्यक्ष, अखिल भारतीय किर्तन संस्था, मुंबई - अशासकीय सदस्य
8) सचिव, सुरसिंगार संसद, मुंबई - अशासकीय सदस्य
9) अध्यक्ष, नालंदा नृत्य कला अकादमी - अशासकीय सदस्य
10) अध्यक्ष, मराठी चित्रपट महामंडळ, कोल्हापूर - अशासकीय सदस्य
11) अध्यक्ष, तमाशा कला, कलावंत विकास मंदिर, मुंबई - अशासकीय सदस्य
12) अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी शाहिर परिषद, मुंबई - अशासकीय सदस्य
13) संचालक, सांस्कृतिक कार्य - सदस्य सचिव

5. उच्चस्तरिय समितीमधील अशासकीय सदस्यांचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मुंबई नागरी सेवा नियम खंड-2 मधील परिशिष्ट-42 (प) येथील सेक्शन 1 मधील 1 (1)(बी) च्या तरतूदीनुसार व शासन निर्णय वित्त विभाग क्र.टीआरए-1032/पसईआर-5, दि.1.2.1984 च्याआधारे नियमित केला जावा. याच नियमाच्या तरतूदी केवळ रेल्वे/सडक प्रवासासाठी लागू असल्यामुळे तसेच शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार प्रथमश्रेणीच्या शासकीय अधिका-यांना किमान प्रवास खर्च करण्यावर बंधन असल्यामुळे अशासकीय सदस्यांना किमान प्रवास तसेच रेल्वेचा वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

6. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी या योजनेसाठी नियुक्त केलेल्या उच्चस्तरिय समितीने मान्यता दिल्याप्रमाणे कलाकारांना अर्थसहायय अदा करण्याची पुढील कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

उ.पाटील

(उत्का पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी/जिल्हा समाजकल्याण अधिकारी/समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद
महालेखापाल, महाराष्ट्र-1/2 (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व तालुका पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोंकण विभाग, वाशी, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती विभाग
ग्राम विकास विभाग (का.24), मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, का.सां.का.1, स.क., सां.का.व क्री.विभाग, मंत्रालय, मुंबई.

----------

1) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्र. डीटीडब्ल्यू-1265/एन, दि. 11 ऑगस्ट 1965.

2) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
क्र. एफएफएस-1090/प्र.क्र. 300/सां.का.1, दि. 16.3.1990

3) शासन शुध्दिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
क्र. एफएफएस-1090/प्र.क्र. 300/सां.का.1, दि. 30.3.1991

4) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
क्र. एफएफएस-1091/55257/प्र.क्र. 446/सां.का.1, दि. 18.6.1992

5) शासन शुध्दिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
क्र. एफएफएस-1091/55257/प्र.क्र. 446/सां.का.1, दि. 8 ऑक्टोबर 1992

6) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्र. एफएफएस-1093/23809/प्र.क्र. 279/सां.का.1, दि. 2 जून 1994

Scanned with CamScanner

(23)

## परिशिष्ट "ब"

### कलाकार व साहित्यिक यांना मानधन मंजूरीबाबतची नियमावली

1) या योजनेस "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन" असे संबोधण्यात यावे.

2) या योजनेखाली व्यक्तींना पात्र व श्रेणी ठरविण्याचे अधिकार शासनाने नियुक्त केलेल्या समितीस राहतील.

3) या योजनेखाली शासनाने नियुक्त केलेल्या समितीने पात्र ठरविलेल्या व्यक्तींना वार्षिक मानधन मंजूर करण्यात यावे.

4) पात्रतेच्या अटी खालीलप्रमाणे असतील--

(अ) साहित्य व कलेच्या क्षेत्रात ज्यांनी मोलाची भर घातली अशी व्यक्ती.

(ब) सांस्कृतिक कला आणि वाङ्मय क्षेत्रात ज्यांनी प्रदीर्घ व महत्वपूर्ण कामगिरी केलेली आहे अशा व्यक्ती.

(क) ज्या पुरुष कलाकारांचे व साहित्यिकांचे वय 50 वर्षापेक्षा जास्त व स्त्री कलाकारांचे व साहित्यिकांचे वय 50 वर्षापेक्षा जास्त आहे अशा व्यक्ती.

(ड) कलाकार व साहित्यिक व त्यांच्या विधवा पत्नी यांना हयात मानधन मिळेल.

(इ) जे कलाकार व साहित्यिक अतिशय आजारी असतील (अर्धांगवायु, क्षय, कर्करोग, कुष्ठरोग व ज्यांना शारीरिक व्यंग असेल व त्यामुळे ते स्वतःचा व्यवसाय करु शकत नसतील) अशा व्यक्ती व त्यांच्याबाबत वयाची अट असू नये.

मानधन मंजूर करताना खालीलप्रमाणे वर्गवारी असावीः-

| वर्ग | दि.2.6.94 च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेले सुधारित दर (वार्षिक) |
|---|---|
| वर्ग-अ | रु.8,400/- |
| वर्ग-ब | रु.7,200/- |
| वर्ग-क | रु.6,000/- |

5) मानधनासाठी विनंती अर्ज करण्याची पध्दत--

मानधन मिळण्यासाठी संबंधितांनी विनंती अर्ज सोबतच्या परिशिष्ट-क मध्ये दिलेल्या विहित नमुन्यात संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नांवे करावा. हा अर्ज दरवर्षी 31 जुलैपर्यंत संबंधित जिल्हयातील समाजकल्याण अधिका-यांकडे पाठवावा. अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करावीत.

(अ) कलाकार, साहित्यिक वा त्यांच्या विधवा पत्नी अलिकडील पासपोर्ट आकाराचे राजपत्रित अधिका-याने प्रमाणित केलेले एक छायाचित्र.

(ब) त्यांच्या जन्मतारखेसंबंधीचा दाखला किंवा त्यासंबंधीचे तहसिलदार, सरपंच, शासकीय रुग्णालयाच्या डॉक्टराने प्रमाणित केलेले अधिकृत कागदपत्र.

(क) कलाकार, साहित्यिक यांच्या कला जीवनाबाबत व साहित्याबाबत त्या त्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, तज्ञ, संबंधित संस्था इत्यादिंना किंवा ग्रामपंचायतीच्या सरपंचानी त्यांच्याविषयी प्रमाणित केलेली माहिती पहिल्या वर्षी अर्जासोबत सादर करावी. पुढे



Scanned with CamScanner

नुतनीकरणाच्यावेळी दरवर्षी देण्याची आवश्यकता नाही. तथापि, दरवर्षी नुतनीकरणासाठी संबंधितांनी विहित नमुन्यात अर्ज करावा.

6) मानधनबाबत संबंधित समाजकल्याण अधिका-यांनी पार पाडावयाची कर्तव्ये--

कलाकार/साहित्यिक किंवा विधवा पत्नी यांनी मानधन मिळण्यासाठी विहित नमुन्यात केलेले अर्ज संबंधित समाजकल्याण अधिका-यांकडे मिळाल्यानंतर त्यांनी अर्जाची बारकाईने छाननी करावी व त्या अर्जावर त्यांचे अभिप्राय देवून 30 सप्टेंबरपर्यंत किंवा जास्तीत जास्त एक महिन्याच्या आंत संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

7) आहरण व संवितरण अधिकारी--

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. शासनाने नियुक्त केलेल्या समितीने मंजूर केलेल्या मानधनाची रक्कम संबंधित व्यक्तींना संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत देण्यात यावी.

8) मानधनासाठी मुदतवाढ--

या योजनेनुसार मानधन मिळणा-या व्यक्तींना मानधन मिळण्यासाठी मुदत वाढवून घ्यावयाची असल्यास चालू वित्तीय सहायय मिळण्याची विहित केलेली मुदत संपण्यांपूर्वी कमीत कमी दोन महिनेआधी संबंधितांकडे अर्ज करावा. नुतनीकरणाची सोपी व साधी पध्दत ठेवावी.

9) ज्या कलाकारांचे/साहित्यिकांचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न रु. 24,000/- पेक्षा जास्त नाही अशांना या योजनेचा लाभ घेता येईल. तथापि, ज्या लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु. 24,000/- पेक्षा जास्त झाल्यास या योजनेखाली वर्षासने बंद करण्यात येतील.

10) लाभार्थींची संख्या दरवर्षी प्राप्त होणा-या अर्जानुसार ठरविण्यात यावी.

11) कलाकार व साहित्यिक यांना मानधन मंजूर करणेबाबत शिफारस करणे, याकरीता शासनाने नेमलेली उच्चस्तरीय समिती सक्षम असेल.

मानधनाची रक्कम संबंधित साहित्यिक/कलाकारांना दरमहा गट विकास अधिका-यांनी अदा करावी. या मंजूर रक्कमेतून मनिऑर्डर कमिशन वजा करुन उर्वरित रक्कम दरमहा मनिऑर्डरद्वारे कलाकारांना अदा करावी.

मानधनाची रक्कम संबंधित व्यक्तींना अदा करण्यापूर्वी प्रत्येक 6 महिन्यांनी संबंधित व्यक्ती हयात असल्याबद्दलचा दाखला त्या व्यक्तीकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

मानधन मंजूर केलेल्या साहित्यिक/कलाकार व विधवा पत्नी यांच्या नांवाच्या पत्त्यासह यादी व मानधनाची रक्कम व त्याअनुषंगाने आवश्यक असलेली तरतूद वर्षाच्या सुरुवातीस संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्याकडून प्रत्येक जिल्हापरिषदेकडे सुपूर्द करण्यात येईल.

या योजनेंतर्गत अर्थसहायय मिळण्यासाठी साहित्यिक/कलाकार/विधवा पत्नी यांनी विहित नमुनयात केलेले अर्ज गट विकास अधिका-यांकडे प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. पफपपस-1090/प्र.क्र.300/सां.का.1, दि. 16 मार्च 1991 अन्वये



Scanned with CamScanner

मान्य केलेल्या वरील नियमानुसार संबंधित गट विकास अधिका-यांनी या अर्जाची प्रत्यक्ष तपासणी/छाननी करुन त्यानुसार अभिप्रायासह सदरहू अर्ज प्रत्येक वर्षी 30 सप्टेंबर किंवा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जास्तीत जास्त 1 महिन्याच्या आंत संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय, विस्तार भवन, मुंबई-400 032 यांच्याकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

गट विकास अधिकारी यांच्या शिफारशीसह प्राप्त झालेले नवीन अर्ज शासन निर्णय दि.16 मार्च 1991 अन्वये शासनाने यासाठी नियुक्त केलेल्या उच्चस्तरिय समितीपुढे सादर करुन समितीच्या निर्णयानुसार या संदर्भातील पुढील कार्यवाही करण्याची सर्व जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची असेल व त्यांनी काढलेल्या आदेशानुसार मंजूर रक्कम गट विकास अधिका-याने संबंधितांना दरमहा अदा करावयाची आहे.

मानधन मंजूर केलेल्या साहित्यिक/कलाकार किंवा विधवा पत्नी यांचे निधन झाल्यास त्याबद्दलची सविस्तर माहिती संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत मंजूर मानधन कलाकारांना दरमहा अदा करता यावे, यासाठी कलाकारांची जिल्हावार व पंचायत समितीवार यादी पत्त्यांसह व आवश्यक त्या तरतूदीसह वर्षाच्या सुरुवातीस संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यातर्फे संबंधित जिल्हापरिषदेकडे सुपूर्द करण्यात येईल. जिल्हापपरिषदेकडे सुपूर्द केलेल्या आर्थिक तरतूदीमधून याव्यतिरिक्त कलाकारांना मानधन मंजूर करण्यासाठी इतर कोणत्याही बाबीवर जिल्हापरिषदेस खर्च करता येणार नाही.

सदरहू मानधन कलाकारांना दरमहा अदा करण्यासाठी जिल्हापरिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिका-यांना या योजनेसाठी आहरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हापरिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी सदर अनुदान कोषागारातून काढून जिल्हा निधीमध्ये जमा केल्यानंतर दरमहा कलाकारांना मानधन अदा करण्यासाठी गट विकास अधिका-यांकडे त्यांचे कार्यक्षेत्रामधील कलाकारां-साठी आवश्यक तेवढी रक्कम वित्त प्रेषणाने देतील. अशी रक्कम गट विकास अधिका-यांकडे प्राप्त झाल्यानंतर गट विकास अधिकारी मंजूर मानधनातून मनिऑर्डर कमिशन वजा करुन उर्वरित रक्कम दरमहा कलाकारांना अदा करतील.

-------